**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

मा.शिक्षण समिति

कार्यपत्रिका क्रमांक - ०४

**सभावृत्तांत**

**दिनांक - ६/०१/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माशिक्षण समितीची पाक्षीक सभा **गुरुवार** दिनांक **०६/१/२०२२** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुस-या मजल्यावरील मा.सभापती शिक्षण समिती सभागृहात मा.सभापती यांचे दालनात मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
**२. मा.पवार मनिषा प्रमोद**
**३. मा.बारसे प्रियांका प्रविण**
**४. मा.सारीका शिवाजी सस्ते**
**५. मा.वाघमारे अश्विनी विक्रम**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.संदिप खोत - उप आयुक्त, मा.स्मिता गौड - प्रशासन अधिकारी (१) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय :-१)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागात उप प्रशासन अधिकारी,सहाय्यक प्रशासन अधिकारी, पदनिर्मिती करणे व पर्यवेक्षक पदसंख्या वाढविणेबाबत..

मा.प्रियांका बारसे , मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय :-२) मा.शिक्षण समिती सभा शुक्रवार दि. २१/०१/२०२२ रोजी दु.२.०० वा.आयोजित करणेबाबत....

मा.प्रियांका बारसे , मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - **मा.प्रियांका बारसे** अनुमोदक - **मा.मनिषा पवार**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माशिक्षण समितीची गुरुवार दिनांक ०६/०१/२०२२ रोजी होणारी पाक्षिक सभा (कार्यपत्रीका क्र.०४) दिनांक १०/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - सोमवार दि.१०/०१/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(राजापुरे माधवी राजेंद्र )**
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०४

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०६/०१**/**२०२**२** ची तहकूब सभा **)**

**दिनांक - १०/०१/२०२२** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **सोमवार** दिनांक **१०/१/२०२२** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दुस-या मजल्यावरील मा.सभापती शिक्षण समिती सभागृहात मा.सभापती यांचे दालनात मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४, दि.०३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे) आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
**२. मा.पवार मनिषा प्रमोद**
**३. मा.बारसे प्रियांका प्रविण**
**४. मा.खानोलकर प्रज्ञा महेश**
**५. मा.वाघमारे अश्विनी विक्रम**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव,मा.संदिप खोत - उप आयुक्त, मा.स्मिता गौड प्रशासन अधिकारी (१) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक - १६ /१२/२०२१ व दि.२०/१२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १०/०१/२०२२

सुचक :- मा. मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा. मनिषा पवार

संदर्भ - मा. प्रियांका बारसे व मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे.प्राथमिक शिक्षण विभागाच्या नियंत्रणात मनपाच्या १०५ शाळा आहेत तसेच शहरातील खाजगी शाळांवर नियंत्रण करावे लागते. पुणे महानगरपालिकेचे शिक्षण विभागाची माहिती घेतली असता त्यांच्याकडे क्षेत्रीय कार्यालयानुसार उप प्रशासन अधिकारी (वर्ग २), सहाय्यक प्रशासन अधिकारी (वर्ग २),व पर्यवेक्षक (वर्ग३),अशी पदे कार्यरत आहेत. मनपा व खाजगी शाळा यांची शासनास वेळोवेळी लागणारी माहिती देणे, शाळाची गुणवत्ता वाढविणे,माहिती संकलित करणे इत्यादी कामे मनपाच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी तात्काळ करावे लागते. कामकाजामध्ये सुसूत्रता तसेच जलद गतीने निर्णय घेणे करिता प्राथमिक शिक्षण विभागात क्षेत्रीय कार्यालयानुसार खालीलप्रमाणे पदनिर्मिती करून त्यावर नियमानुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या शासन निर्णयानुसार कर्मचारी नियुक्ती करणे आवश्यक आहेप्राथमिक शिक्षण विभागात १ उप प्रशासन अधिकारी,८ क्षेत्रीय कार्यालायानुसार ८ व १मुख्य कार्यालय असे ९ सहाय्यक प्रशासन अधिकारी आवश्यक आहे त्यापैकी १ प्रशासन अधिकारी पद मंजूर असल्याने उर्वरित ८ पदे निर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयास २ व मुख्य कार्यालयास २ असे १८ पर्यवेक्षक आवश्यक असून त्यापैकी ७ पदे मंजूर असल्याने उर्वरित ११ पदे नव्याने निर्मिती करून मंजूर करणे आवश्यक आहे. नवीन पद व जुन्या पदामध्ये वाढीव पदे निर्मिती करणेबाबतची संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | सध्याच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (१) | सुधारीत आकृतीबंधानुसार प्रस्तावित पदसंख्या (२) | आवश्यक पदसंख्या (१-२) |
|---|---|---|---|---|
| १ | उप प्रशासन अधिकारी ( वर्ग २) | ० | १ | १ |
| २ | सहाय्यक प्रशासन अधिकारी ( वर्ग २) | १ | ९ | ८ |
| ३ | पर्यवेक्षक ( वर्ग ३) | ७ | १८ | ११ |

तरी उपरोक्त पदे व संख्या प्राथमिक शिक्षण विभागाकरिता नव्याने निर्मिती करून पदसंखेत वाढ करणेस व त्यास शासन मान्यतेकामी प्रस्ताव सादर करून उमेद मान्यतेवर पदे भरण्यास मान्यता देणेकामी  मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरचा ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -  ०८ | विषय क्रमांक - ०२

दिनांक - १०/०१/२०२२

सुचक :- मा. मा.प्रियांका बारसे | अनुमोदक : मा. मनिषा पवार

संदर्भ - मा. प्रियांका बारसे व मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

मा. शिक्षण समितीची पुढील सभा गुरुवार  दि. २०/०१/२०२२ रोजीची  दु. २.०० वा आयोजित करण्यात आलेली होती. परंतु सदर दिवशी मा. महानगरपालिकेची सभा असल्याने सदरची मा.शिक्षण समिती सभा शुक्रवार दि. २१/०१/२०२२ रोजी दु.२.०० वा. आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**राजापुरे माधवी राजेंद्र**)
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११/२०२२
दिनांक : ११/0१/202२



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.तज